महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्यमाध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४
दूरध्वनी क्र.:-020-29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com

**परीक्षा प्राधान्य**

जा.क्र. मरापप/जीसीसी/संटां/प्रशा/जून२०२४/ 2522
दिनांक :- 08/ 06 /२०२४.

प्रति,

**संस्थाचालक,**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जून -२०२४**
**परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबत...**

**संदर्भ :-** या कार्यालयाची अधिसूचना दि.१०/०१/२०२४.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) दि. १०/०६/२०२४ ते दि. २०/०६/२०२४ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने घेतली जाणार आहे. सदर परीक्षेसाठी ज्या संस्थांनी परीक्षार्थी प्रविष्ठ केले आहेत. त्या संस्थाना परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, याबाबत संस्थानी पुढील बाबींची दक्षता व नोंद घ्यावी.

१. इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. परीक्षा दि. १०/०६/२०२४ ते १४/०६/२०२४ या कालावधीत घेतली जाणार आहे. सदर परीक्षा सुरु होण्यापूर्वी (दि.०७/०६/२०२४ व ०८/०६/२०२४ रोजी स.११ : ०० पर्यंत) Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.
२. मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि. परीक्षा दि. १८/०६/२०२४ ते २०/०६/२०२४ या कालावधीत घेतली जाणार आहे. सदर परीक्षा सुरु होण्यापूर्वी (दि. १५/०६/२०२४ व १६/०६/२०२४ रोजी स.११ : ०० पर्यंत) Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.
३. परीक्षा केंद्रावर जमा केलेले Keyboard आणि Mouse त्या परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थ्यांना वापरण्यास उपलब्ध असतील.
४. संबंधित केंद्रावरील संपूर्ण् परीक्षा पूर्ण झाल्यानंतर Keyboard आणि Mouse संस्थाना परत मिळू शकतील म्हणजे संबंधित संस्थेस परीक्षा पूर्ण होण्यापूर्वी Keyboard आणि Mouse परत मिळू शकणार नाहीत.
५. संगणक संस्थांनी Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रांना उपलब्ध करुन देणे हे ऐच्छिक असेल. तसेच या साहित्याची हानी, तूट-फूट झाल्यास अथवा हरवल्यास त्याची कोणतीही भरपाई परीक्षा केंद्राकडून अथवा परीक्षा परिषदेकडून मिळणार नाही. याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.
६. परीक्षा केंद्रावर स्वत:चे Keyboard आणि Mouse टायपिंग संस्थांनी उपलब्ध करुन देण्यास परवानगी देण्यात आली असल्याचे परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**(डॉ. नंदकुमार बेडसे)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०४.**

**प्रत :-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व.
३. शिक्षण निरीक्षक (उ/द/प)
४. सर्व केंद्रसंचालक व केंद्रसमन्वयक ( I T टीचर) परीक्षाकेंद्र (GCC-TBC) जून -२०२४.